महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१५ वा | दिनांक : १४/१०/२०२५ | वार : मंगळवार

## राज्य पातळीवर बोलत असताना जातिवाचक बोलू नका : शरद पवार



**मुंबई** : महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून त्यानुसार सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार असल्याचे शरद पवारांनी जाहीर केले आहे. तसेच यावेळी धर्मनिरपेक्षता जपण्याचे आवाहनही शरद पवारांनी सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले आहे.

बैठकीत बोलताना शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध केला आहे. ते म्हणाले, पूर्वी आपल्या पक्षात असणारे एक आमदार सध्या जाती-जातीत तणाव निर्माण होईल अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत, हे अत्यंत चुकीचे आहे. जातीय सलोखा ठेवा, स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर बोलत असताना जातिवाचक बोलू नका, बोलताना प्रेमाची भाषा वापरा, आपण करत असलेल्या विधानामुळे जातीय सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्या, अशा सूचना शरद पवार यांनी दिल्या आहेत.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, राजकारणात जाती धर्मावर राजकारण करण्याची महाराष्ट्राची परंपरा नाही. लोकांच्या लोकप्रियतेपेक्षा ते जास्त महत्वाचे आहे. वाचाळवीर वाढले आहेत, दुदैव आहे कोणी कोणाकडून काय खरेदी करावे यावर सरकार गप्प बसते? सरकारचा त्याला पाठिंबा आहे का? दरी निर्माण केली जात असल्याचे देखील पवार म्हणाले.

राजकारणात तरुणांना संधी देण्याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, जास्तीत जास्त तरुणांना संधी कशा प्रकारे देता येतील यासाठी प्रयत्न करा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आगामी काळात कशा प्रकारे युती करायची याबाबत महाविकास आघाडीच्या नेत्यांची उद्या बैठक पार पडणार असल्याची देखील माहिती बैठकीत देण्यात आली. येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत निर्णय करा, अशा सूचनाही शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच आपल्याकडे इच्छुकांची संख्या खूप आहे, काम करणाऱ्यांची संख्या खूप आहे. आज अल्पसंख्यांक समाजाचा निर्णय घेतला असेच युवक आणि युवतींचा निर्णय होणार असल्याचे शरद पवारांनी सांगितले.

महाराष्ट्रातील अतिवृष्टीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, अतिवृष्टी संदर्भात राज्य सरकार जी मदत करत आहे, ती तुटपुंजी आहे. केंद्रीय पथकाने येऊन पाहणी केली पाहिजे होती. आमच्या वेळेस केंद्रीय पथक येऊन पाहणी करून भरगोस मदत देत होते. नरसिंह राव जेव्हा पंतप्रधान होते तेव्हा ते राज्यात अतिवृष्टीच्या पाहण्यासाठी येणार होते. पण, तेव्हा मीच त्यांना पाहण्यासाठी येऊ नका असे म्हटले. कारण, शासकीय यंत्रणा तुमच्या दौऱ्यासाठी लागेल, त्यामुळे मदतही होणार नाही, असेही शरद पवार म्हणाले.

## आमदाराला हनीट्रॅपमध्ये अडवण्याचा प्रयत्न

**मुंबई** : पुरुष असूनही महिला असल्याचे भासवून राज्यातील एका आमदाराला हनीट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका भामट्याला चितळसर पोलिसांनी कोल्हापूर येथून अटक केली आहे. हा भामटा पीडित आमदाराला महिलांचे नग्न फोटो पाठवून १० लाख रुपयांची खंडणी मागत होता. पण हा प्रकार आपले राजकीय आयुष्य उद्ध्वस्त करणारा असल्याचे लक्षात येताच आमदाराने पोलिसांत धाव घेऊन आपबीती कथन केली. परिणामी, वेळीच या प्रकरणाचा भांडाफोड झाला.

मोहन पवार (२६) असे आरोपीचे नाव आहे. तो महिला असल्याचे भासवून समोरच्या व्यक्तीशी चॅट करत असे. आमदार महोदयांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते २०२४ मध्ये विधानसभा मतदारसंघात असताना त्यांच्या व्हॉट्सॲप क्रमांकावरून एक महिला त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होती. सुरुवातीला त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पण वारंवार संपर्क होत असल्यामुळे एकदा त्यांनी फोन उचलला. त्यावेळी महिलेने त्यांच्याशी मैत्री करण्याची इच्छा प्रकट केली. त्यांनी तिला नकार दिला. पण त्यानंतरही ती महिला वारंवार त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करू लागली. अखेर त्यांनी तिला ब्लॉक केले.

त्यानंतर २०२४ मध्ये आमदार विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेत. त्यावेळी सदर महिलेने दुसऱ्या एका मोबाईल क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. प्रचारात व्यस्त असताना ती दररोज त्यांना अश्लील छायाचित्रे पाठवू लागली. यावेळी आमदारांनी तिला धारेवर धरले असता, तिने त्यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार देण्याची धमकी दिली. त्यानंतर महिन्याभरापूर्वी पुन्हा त्या महिलेने वेगळ्या मोबाईल क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. तसेच अश्लील छायाचित्रे पाठवून १० लाख रुपयांची मागणी केली.

हा प्रकार आपले राजकीय आयुष्य उद्ध्वस्त करणारा असल्याची बाब आमदार महोदयांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनी तत्काळ पोलिसांत धाव घेऊन यासंबंधीची तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारावर चितळसर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला. त्यात त्यांना खंडणी मागणारा व्यक्ती कोल्हापूरचा असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी कोल्हापूर येथून मोहन पवार नामक आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची कसून चौकशी केली असता त्यांनी संबंधित आमदाराला आपणच अश्लील फोटो पाठवल्याचे मान्य केले. त्याला कोर्टापुढे हजर केले असता कोऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी ठोर्टाने त्याला १५ ठावली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी विज्ञान शाखेचा पदवीधर आहे. पूर्वी तो लोणावळा येथील एका उपहारगृहात सफाई कामगार म्हणून काम करत होता. जास्तीचे पैसे कमावण्याच्या नादातून त्याने हे कृत्य केले. तो ज्या लोकांना हनी ट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करत होता, त्यांच्याशी तो महिला म्हणून संवाद साधत होता. त्यांना अश्लील फोटो व व्हिडिओ पाठवून आपल्या जाळ्यात अडवण्याचा प्रयत्न करत होता. यासाठी तो सोशल मीडियावरील फोटोंचा वापर करत होता.

## निवडूक आयोगाच्या मतदार यादीत अनियंत्रित अन् संशयास्पद वाढ : जितेंद्र आव्हाड

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदार याद्यांमध्ये मतदारांची अनियंत्रित व संशयास्पद वाढ झाल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी त्यांनी व्होट चोरीचा मुद्दा उपस्थित करत या प्रकारावर अंकुश लावण्यासाठी आयोगाकडे ५ मागण्या केल्या आहेत.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर परिषद आणि नगर पंचायती निवडणुकांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदार यादीकडे सखोल निरीक्षण केल्यास, सरासरी मतदारसंख्येमध्ये अनियंत्रित आणि संशयास्पद वाढ झाल्याचे दिसून येते. या वाढीचा अधिकृत टक्केवारी दर आजतागायत जाहीर करण्यात आलेला नाही, तसेच मतदारयादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांची संख्या, कारणे आणि वगळणीसाठी वापरलेले निकष देखील सार्वजनिक करण्यात आलेले नाहीत. ही माहिती मतदार पारदर्शकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, ती राज्य निवडणूक आयोगाने तातडीने जाहीर करणे आवश्यक आहे.

तसेच, नव्याने समाविष्ट झालेल्या मतदारांपैकी किती जणांनी स्वतःहून ऑनलाईन अथवा ऑफलाईन अर्जाद्वारे नाव नोंदवले आहे, याची माहिती संबंधित BLO डायरीत उपलब्ध आहे का, याबाबत आयोगाकडून कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नाही. हे मतदार यादीच्या प्रामाणिकतेवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण करते.

ते पुढे म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने “महा सर्व” या पोर्टलमार्फत नवीन मतदार नोंदणीसाठी कायदेशीर प्रक्रिया, पडताळणी आणि तांत्रिक सत्यापनाच्या बाबींचा उल्लेख केला असला, तरी प्रत्यक्षात त्या प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात आल्या आहेत का, याबाबत गंभीर शंका निर्माण होत आहे. याव्यतिरिक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलेली मतदारयादी तपासणीसाठीची अधिकृत लिंक (दुवा) सध्या कार्यरत नाही किंवा अनुपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे.

ही बाब लोकशाही पारदर्शकतेच्या मूलभूत निकषांचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने तातडीने पुढील बाबी स्पष्ट कराव्यात व आवश्यक कार्यवाही करावी.

मतदारसंख्या वाढीचा अधिकृत आकडा व टक्केवारीसह संपूर्ण तपशील सार्वजनिक करावा.

मतदारयादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांचे निकष, कारणे व प्रमाण स्पष्ट करावे.

BLO डायरीतील स्वयं-नोंदणीकृत मतदारांची संख्या व तपशील सार्वजनिक करावेत.

“महा सर्व” पोर्टलवरील नोंदणी प्रक्रियेत पाळलेल्या कायदेशीर व तांत्रिक निकषांचा अहवाल प्रसिद्ध करावा.

मतदारयादी शोधण्यासाठीचा अधिकृत दुवा (link) तात्काळ कार्यान्वित करावा.

मतदार नोंदणी ही लोकशाहीतील पारदर्शकतेचा पाया आहे. त्यात किंचितही शंका, अपारदर्शकता किंवा माहिती दडविणे हे राज्य निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेस गंभीर तडा देणारे ठरते, असेही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५


## गडूजीराव देशमुख महाविद्यालय येथे इतिहास विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर** : वाळूज बजाज नगर येथील दगडूजीराव देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे सम्राट अशोक आणि बौद्ध धम्म या विषयावर इतिहास विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून संघराज्य धम्मकीर्ती यांनी विद्यार्थ्यांना बौद्ध धम्म आणि सम्राट अशोक यांच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभाग प्रमुख डॉ. सचिन रमेश साळवे यांनी अध्यक्षीय समारोपात सम्राट अशोकाचा धम्म यावर विचार मांडले, प्रास्ताविक व आभार डॉ. राम भोसले यांनी केलेयावेळी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व प्राध्यापकांची उपस्थिती होती.

## डॉ. प्रभाकर शेळकेंच्या विनोदी कथेला तृतीय पुरस्कार



**जालना** : जिल्ह्यातील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या 'कंदूरी- एक मुंढी चारपाय' या विनोदी कथेला राज्यस्तरीय गुंफण अकादमी पुरस्कार मिळाला.

गेल्या २३ वर्षांची विनोदी कथा साहित्यलेखन स्पर्धाची ही परंपरा आहे.साप्ताहिक गुंफण साहित्य अकादमी चे संपादक संयोजक डॉ बसश्वेवर रामचंद्र चेणगे,कराड.या वर्षी जालना जिल्ह्यातील लेखकाला हा सन्मान मिळाला आहे.गुंफण दिपावली अंकामध्ये या कथेचा समावेश केला आहे.

त्यांच्या या वाङ्मयीन यशाबद्दल मसाप अध्यक्ष रवींद्र तौर तात्या कवी कैलास भाले, डॉ सुहास सदावर्ते,सुनील लोणकर,मनीष पाटील, रमेश भूतेकर, सुभाष कोळकर, पंडितराव तडेगावकर, बाळासाहेब तनपुरे, प्रा पांडूरंग खोजे, दशरथ बुणगे, रंगनाथ खेडकर, सुहास पोद्दार,शकिक सय्यद, विठ्ठलराव टेपले, तुकाराम पवार, रामभाऊ शेळके, पंढरीनाथ मांदळे, बाबासाहेब ताठे,अनिरुद्ध पावसे,नारायण खरात,डॉ.शोभा यशवंते, देवराव सोनवणे,सुनीता शेळके, प्रल्हाद टकले, नामदेव शेळके कल्याण नरोडे,अरविंद देव, देवीदास माने, रमेश नाईक,भगवान सवळे, जालिंदर बटूळे, गणेश ढाकणे, नारायणराव देवढे इ.शेळके यांचे अभिनंदन केले.

## सेवानिवृत्त पीएसआय बाबुराव नागरे किनगाव राजा सर्कल मधून जिल्हा परिषद निवडणूक लढवणार..



**बुलढाणा (महेश मुंढे)** : सिनखेडराजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथील असलेले सेवानिवृत्त पीएसआय बाबुराव नागरे यांनी पोलीस प्रशासनामध्ये त्यांनी स्वतःचा चांगला दबदबा निर्माण केला होता नोकरी करत असताना सिनखेडराजा मतदार संघातले अनेक शेतकरी गरजू लोकांना आर्थिक मदत व दवाखान्यासाठी त्यांनी मदत ही खूप केली आहे.

रात्रीच्या बारा एक वाजता सुद्धा त्यांना फोन केला की ते धावून येत होते त्यांनी अनेक संकटामध्ये त्यांनी मदत केली आहे त्यांना समाजसेवक या नावाने त्यांनी ओळख निर्माण केली आहे.

आज रोजी ते हिवरखेड पूर्णा येथील उपसरपंच पदावर आहेत त्यांनी पंधरा ते वीस वर्षाच्या पूर्वीपासून बंद असलेली बस सेवा सुद्धा चालू केली आहे त्यामुळे किनगाव राजा सर्कलमध्ये त्यांच्या नावाची जिल्हा परिषद निवडणूक लढवावी अशी हिवरखेड पूर्णा येथील ग्रामस्थांची मागणी आहे व संपूर्ण सर्कल मधून सुद्धा त्यांना फोन येत आहे.

सामान्य जनतेमधून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आंदोलन सुद्धा उभारणार आहे ते जिल्हा परिषद निवडणूक लढवणार आहे एखाद्या पक्षाने तिकीट दिल्यास जबाबदारी स्वीकारणार आहे तिकीट नाही मिळाल्यास स्वबळावर लढवायची तयारी सुद्धा त्यांनी दर्शवली आहे


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिंग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात कोजागिरी पौर्णिमा व दीपावली निमित्त संगीतोत्सव साजरा



**छत्रपती संभाजीनगर** :- 'सुरात साजरी कोजागिरी - दिवाळीचा आनंद उरी' हा कार्यक्रम डॉ . सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात अतिशय उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमासाठी मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष डॉ. कल्पलता पाटील भारस्वाडकर , सचिव धनंजय कुलकर्णी, प्राचार्य डॉ सुनिता बाजपाई, सुहास पाटील प्रमुख यांची उपस्थिती होती. त्याप्रसंगी मान्यवरांनी उपस्थितांना कोजागिरी व दिवाळीच्या निमित्त शुभेच्छा संदेश दिला.

याप्रसंगी कु. कल्याणी दीक्षित बी.ए. तृतीय वर्ष या विद्यार्थ्यांनीला विद्यापीठ युवक महोत्सवात पारितोषक प्राप्त झाले तसेच केंद्रीय युवक महोत्सवात तिची निवड झाल्याबद्दल तसेच डॉ. मीनल श्रीगिरीवार यांना ग्रीन क्लब अवॉर्ड मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या कामी सहाय्यक डॉ. अन्विता अग्रवाल, डॉ. विशाखा जोशी, डॉ. प्रतिभा धोंडकर यांचाही सन्मान केला आला. यानंतर प्रत्यक्ष संगीतोत्सव कार्यक्रमास सुरुवात झाली.

एका पेक्षा एक अतिशय सुंदर गाण्यांची निवड या कार्यक्रमात करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात अकरावी कला विभागाची प्रसिद्धी थोटे या विद्यार्थिनीने 'माझी रेणुका माऊली' या गीताने केली. राधिका दैठणकर या विद्यार्थीनीने गुरु माता गुरु पिता, सिद्धी पाठक हिने 'मला हे दत्तगुरु दिसले', कल्याणी दीक्षित हिने 'अवघा रंग एक झाला' या गीतांनी कार्यक्रमात बहार आणली.

यानंतर कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. शंकर विधाते यांनी 'कानडा राजा पंढरीचा' हे गीत अतिशय सुंदर आवाजात सादर केले. तसेच त्यांनी संत कबीरांची साईने रंग डाला ही गीत रचना गायली. संगीत विभागप्रमुख डॉ. दिलीप दोडके यांनी 'गेलो गेलो पंढरपुरा, परबत बॉस मंगाओ, तर डॉ. पराग चौधरी यांनी ' नाही पुण्याची मोजणी, नाही पापाची टोचणी' तसेच 'कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर' हे गीत सादर केले.

या कार्यक्रमातील विद्यार्थिनी व प्राध्यापकांच्या गीत गायनाने श्रोते अक्षरशः कोजागिरीच्या चांदण्यात आणि दिवाळीच्या आनंद उत्सवात चिंब झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शोभा हनवते यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. पराग चौधरी यांनी केले. तबलावादक दिनेश डोळे तर हार्मोनियम वादक प्रा. गजानन केचे यांनी साथसंगत दिली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील संस्थेचे पदाधिकारी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शहरातील रसिक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५


## आदर्श शिक्षिकेच्या निरोप निरोप समारंभात अश्रूंचा महापूर





**छत्रपती संभाजीनगर :** *सुदामवाडी :* जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, सुदामवाडी येथील 'आदर्श शिक्षिका' सौ. ज्योती विठ्ठलराव निकम यांना प्रशासकीय बदलीमुळे शाळेस निरोप देताना शनिवारी झालेला सोहळा हृदयस्पर्शी ठरला. शिक्षिकेच्या कारकिर्दीतील या महत्त्वपूर्ण टप्प्यावर, शाळेच्या मुलांनी, पालकांनी आणि ग्रामस्थांनी केलेल्या भावपूर्ण निरोपाने संपूर्ण शाळा परिसर भावुकतेने गहिवरून आला.छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेकडून 'आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळवलेल्या शिक्षिका ज्योती निकम यांच्या सन्मानार्थ आयोजित सोहळ्यात, त्यांचे आगमन पारंपरिक ढोल, लेझीमच्या सुंदर ठेक्यावर आणि फुलांच्या वर्षावाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षिकेच्या आईच्या हस्ते मंचाचे उद्घाटन करण्यात आले. हा मंच निकम मॅडम यांनी त्यांच्या निरोपाच्या निमित्ताने शाळेस भेट म्हणून दिला आहे, ज्याची किंमत सुमारे अकरा हजार रुपये आहे.सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीपदादा पवार तथा सरपंच सौ. शोभाताई जगधने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात आठवीच्या विद्यार्थ्यांनी 'सरस्वती वंदना ' आणि 'स्वागत गीत' सादर करून सर्वांचे मन जिंकले.पालक वर्गाच्या बाजूने रेणुकाताई जगधने, प्रभाकरजी सोनवणे, अर्चना थोरात, रेखाताई सोनवणे यांनी आपल्या मनातल्या भावना व्यक्त करताना अश्रूंना वाट मोकळी केली. विद्यार्थिनी सिद्धी शेवाळे यांनी मॅडमवर कार्यावर लिहिलेली कविता वाचली, तेव्हा सर्वच उपस्थितांचे डोळे पानावले. ईश्वरी पवार, अनुष्का मोरे, आराध्या वाघ, आशिष पवार, शितल सोनवणे या विद्यार्थ्यांनी निकम मॅडमकडून मिळालेले संस्कार आणि अनुभव सांगितले, तेव्हा शिक्षिकेच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्याचा प्रभाव स्पष्ट झाला.शाळेतील सर्व विद्यार्थी आणि पालक यांनी एकजुटीने आदरणीय बाईंचा सन्मान करून, केलेल्या कार्याची दखल म्हणून त्यांना अनेक भेटवस्तू अर्पण केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सीमा आठरे यांनी केले, ज्यांच्या मनमोकळ्या आणि हृदयस्पर्शी शैलीने संपूर्ण मंडप भावुकतेने गहिवरला. शेवटी, श्री. संतोष पैठणकर यांनी आभार प्रदर्शन केले.या संपूर्ण कार्यक्रमासाठी पद्माकर शेवाळे, ज्ञानेश्वर पवार, बाळासाहेब सोनवणे, राम फलके, रवी अनर्थे, जयश्री पवार, दिलीप ढमाले यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी गावकऱ्यांनी सर्वांसाठी भोजनाचे आयोजन केले होते.शिक्षिका ज्योती निकम यांनी शाळेतील सेवादरम्यान दिलेले मार्गदर्शन आणि प्रेम विद्यार्थी आणि गावकऱ्यांच्या मनात नेहमीच राहील, अशी भावस्पर्शी नोंद घेऊन हा सोहळा संपन्न झाला.जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता आणि शिक्षकांचे कार्य अधोरेखित करणारे असे समारंभ निश्चितच कौतुकास्पद आहे.

## पश्चिम विभागीय एनएसएस प्री-आरडीसी परेड शिबिर- २०२५ साठी दिपाली गायकवाडची निवड



**कन्नड :** शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड येथील एन एस एस विभागाची स्वयंसेविका दिपाली गायकवाडची हिची पश्चिम विभागीय एनएसएस प्री-आरडीसी परेड शिबिर- २०२५ ( West Zone NSS Pre-Republic Day Parade Camp 2025) साठी निवड झाली असून हेमीचंद्रचार्य उत्तर गुजरात विद्यापीठ पाटण येथे दि ३१/१०/२०२५ ते ९/११/२०२५ या कालावधीत तिचे प्रशिक्षण होणार आहे.

यावेळी तिचा सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य भाऊसाहेब मगर कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, डॉ. सीमा काशीद. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ क्षीरसागर सर,एनएसएस स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## तालुकास्तरीय मैदानी (ॲथलेटिक्स) क्रीडा स्पर्धेमध्ये अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स शाळेचे यश

**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दि १३/१०/२०२५राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानेशालेय तालुकास्तरीय मैदानी (ॲथलेटिक्स) क्रीडा स्पर्धा या स्पर्धेमध्ये अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स शाळेतील विद्यार्थी पृथ्वीराज राजपूत १७ वर्ष वयोगटात भालाफेक गंगापूर तालुक्यामध्ये प्रथम ३४.७५ध्रुव वाटाणे भालाफेक १७ वर्ष वयोगटात गंगापूर तालुक्यामध्ये तृतीय ३२.६६प्रेम चंदेल गोळाफेक १४ वर्ष वयोगटात गंगापूर तालुक्यामध्ये प्रथम ७.५०सुरजीत जोनवाल लांबउडी १४ वर्ष वयोगटात गंगापूर तालुक्यामध्ये प्रथम ४.३०जीवन दागोडे लांबउडी १७ वर्ष वयोगटात गंगापूर तालुक्यामध्ये प्रथम ४.८०


**Education of the Day**

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

**B.A.** (मराठी व उर्दू माध्यम)

**M.A.**- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५


# अथक परिश्रम हेच यशाचे गमक : प्राचार्य केशव भांगे



**शिरुर कासार** : दि.13 ऑक्टोबर 2025 सोमवार रोजी,आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.)ता.शिरूर (का.) जि.बीड येथे, विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या वतीने चि.संग्राम आप्पासाहेब येवले यांचा शाल, श्रीफळ,पुष्पहार व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी एम.पी.एस.सी.परीक्षेचा निकाल जाहीर केला असून या परीक्षेमध्ये चि.संग्राम आप्पासाहेब येवले हे "विक्रीकर निरीक्षक'पदाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून,त्यांची महाराष्ट्र शासनाच्या आयकर विभागात,विक्रीकर निरीक्षक पदी निवड झाली आहे.

चि.संग्राम येवले यांनी कालिकादेवी विद्यालयात, माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. विद्यार्थ्यांचे कौतुक म्हणून त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचबरोबर चि.संग्राम येवले यांचे वडील साक्षाळपिंपरी उच्च माध्यमिक विद्यालयाचे, प्राचार्य आप्पासाहेब येवले यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

त्यानंतर प्राचार्य आप्पासाहेब येवले यांनीही शिरूरचे प्रतिनिधी या नात्याने प्राचार्य केशव भांगे साहेब यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी अध्यक्षीय भाषणातून सांगितले की,चि.संग्राम येवले यांनी अथक परिश्रम घेतले म्हणून त्यांना उज्ज्वल यश मिळाले;कारण शिरूर सारख्या ग्रामीण भागामध्ये शिक्षण घेऊन महाराष्ट्र शासनाची एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आणि आपल्या विद्यालयाचे नाव,त्यांच्या कुटुंबाचे नाव व स्वतः च्या आई-वडिलांचे नाव लौकिक केले आहे.


म्हणून संग्रामच्या या यशाचा आपल्याला अभिमान वाटतो.यापुढेही संग्रामने शासनाच्या उच्च पदावर उत्तरोत्तर प्रगती करावी आणि उज्ज्वल यश मिळवावे,यासाठी त्यांच्या पुढील कर्तुत्वाला व आयुष्याला आपल्या हार्दिक-हार्दिक शुभेच्छा.

यावेळी प्रा.महारुद्र डोंगरे,सत्कारमूर्ती चि.संग्राम येवले,प्रा.प्राचार्य आप्पासाहेब येवले,बीडचे माजी शिक्षणाधिकारी डी.टी.सोनवणे साहेब यांनी आपल्या मनोगतातून,संग्राम येवले यांना भरभरून शुभेच्छा दिल्या.

वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय तुपे व मा.डी.टी.सोनवणे साहेब यांनीही चिरंजीव संग्राम येवले यांचा सत्कार केला.व शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.संजय काकडे यांनी केले.यावेळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

## धुळे-सोलापूर महामार्गावर माळीवाडा उडान पुलावर ऊसतोड कामगार ट्रॅक्टर ला ट्रक ची धडक होऊन सहा जण जखमी



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : धुळे सोलापूर महामार्गावर माळीवाडा गावाजवळ दि.१३,सोमवारी सकाळी ११ वाजे दरम्यान ट्रॅक्टर ट्रॉलीला पाठीमागून धडक दिल्याने गोरख लक्ष्मण जाधव, वय-१६, प्रिया लक्ष्मण जाधव, वय-१२, जगन भावडू पवार,वय-२१, रामदास जाधव, वय-६०, शांताबाई रामदास जाधव, वय-५५,अनिल मोरे, वय-१४,सर्व रा.लोणा,ता.भडगाव, जि.जळगाव हे जखमी झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार लोणार येथून करोडी टोलनाका कडे जणाऱ्या ट्रॅक्टर ची ट्रॉली मुंडक्यापासून वेगळी झाल्याने पाठीमागून येणाऱ्या ट्रक क्रमांक GJ ०३ BT ४१६७ ने धडक दिल्याने अपघात होऊन सर्व सात जण जखमी झाले जखमींना जगद्गुरु नरेंद्राचार्य संस्थांच्या रुग्णवाहिकेत ग्रामस्थांच्या मदतीने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५


## निसर्गाचे रूप

कोकिळेची कुहू-कुहू
आंब्याच्या वनी
इवलासा ससा धावे
हिख्या हिख्या रानी

मोर ताल धरी
फुलवूनी पिसारा
मन प्रसन्न करी
शितल वारा

माकडाला पाहून
पळे खारुताई
शेपूट हलवित
मागे वळून पाही

तळ्याकाठी विसावला
बगळ्यांचा थवा
पक्षी तृप्त होई
खाऊनी रानमेवा

रंगीबेरंगी फुलपाखरे
फुलासोबत खेळी
निसर्गाचे सुंदर रूप
दिसे सांजवेळी




**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## वाट वळणाची

वाट वळणाची
दिशा नीट दावेल का.?
स्वप्न मनातले गवसेल का.?
रंग जीवनाचा
चंदनापरी उगळेल का.?

संघर्षाचा कासरा लागला हाताला
घामाच्या प्रत्येक क्षणाक्षणाला
पावला पावली झिजवावे देहाला
वाट वळणाची
दिशा नीट दावेल का.?
रंग जीवनाचा
चंदनापरी उगळेल का.?

हरामाचं जगणं पटत नाही मनाला
कष्टाच्या भाकरीचा आनंद मनाला
मला जायचं माणुसकी असलेल्या
माणसाच्या गावाला
वाट वळणाची
दिशा नीट दावेल का.?
रंग जीवनाचा
चंदनापरी उगळेल का.?


**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
छत्रपती संभाजीनगर
मो.नं-८८८८६०६०६८


## मान

ऑफिसमध्ये अन् मोबाईलमध्ये
झुकलेली मान
थकून जाते दिवसभरात
खाली पाहू पाहू..

रात्री दोन घास खाऊन
निघतो मी फिरायला
शतपावलीच्या निमित्ताने
मोकळ्या आकाशाखाली बाहेर..

अन् बघतोय वर करून मान
चांदण्यांनी भरलेलं
दूर दूर पसरलेलं
निरभ्र आकाश..

बोलू लागतात
देवाघरी गेलेले मायबाप
होऊन लुकलुकणाऱ्या चांदण्या

अन् सुरू होतो संवाद
माझाच माझ्याशी
वाचू लागतो मी,नव्याने मला
माझ्याच शोधासाठी..


**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड
मो.९४०३३८४८८९



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## महानगरपालिका माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर शाळेच्या मुली रगबी खेळामध्ये जिल्ह्यात प्रथम




**छत्रपती संभाजीनगर :** ऐतिहासिक कामगिरी! पहिल्यांदाच रग्बी खेळामध्ये सहभाग आणि थेट सुवर्णपदकाचा मान !

माननीय आयुक्त तथा प्रशासक श्री. जी. श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून आयोजित आम्हाला खेळू द्या " या उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय महानगरपालिका हद्दीतील रग्बी स्पर्धा २०२५ २६ या स्पर्धेत महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा येथील विद्यार्थिनींनी प्रथमच जिल्हास्तरीय रग्बी या खेळात सहभाग नोंदवला आणि १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक (सुवर्णपदक) मिळवत अभूतपूर्व यश संपादन केले आहे.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्व विद्यार्थिनींचे मन:पूर्वक अभिनंदन करताना — श्री. अंकुश पांढरे सर (उपआयुक्त, शिक्षण विभाग ) श्री. गणेश दांडगे सर ( नियंत्रण अधिकारी ) श्री. संजीव प्रसाद बालया सर ( मनपा क्रीडा अधिकारी* ) श्री. ज्ञानदेव सांगळे सर ( समग्र शिक्षण अभियान अधिकारी ) श्री. भरत तीनगोटे सर ( शिक्षण अधिकारी ) यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींचे मनोबल उंचावले व प्रेरणा दिली.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. शिंदे सर , सहशिक्षक श्री. जी. एस. पठाण सर, मनिषा शिंदे आणि क्रीडा शिक्षक श्री. इरफान सय्यद सर यांनी विद्यार्थिनींना दिलेले योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण यांच्या जोरावर हे यश संपादन झाले आहे .

या ऐतिहासिक विजयाबद्दल संपूर्ण शाळा परिवाराचे मन:पूर्वक अभिनंदन ! पुढील विभागीय आणि राज्यस्तरीय स्पर्धांसाठी हार्दिक शुभेच्छा!

## महिला महाविद्यालयात मोफत स्पर्धा परीक्षा फाउंडेशन कोर्सचा समारोप




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयातील सामाजिक शास्त्रे व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता 'मोफत स्पर्धा परीक्षा फाउंडेशन कोर्स' चा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी विशेष सहाय्यक कक्ष अधिकारी, मंत्रालय,मुंबई येथील मा.श्री गणेश पाटील प्रमुख पाहुणे म्हणून लाभले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई या होत्या . आय क्यू ए सी समन्वयक डॉ. पराग चौधरी ,कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. माधुरी भावसार व समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ.आरती धनवे मंचावर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे माननीय श्री. गणेश पाटील यांनी 'स्पर्धा परीक्षेतील यशाची गुरुकिल्ली' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की, स्पर्धा परीक्षेचे अध्ययन करत असताना त्यातील सातत्य टिकवून ठेवावे.

तसेच पदवीला असलेल्या विषयाच्या तासिकांना नियमित उपस्थित राहून आपल्या ज्ञानात भर घालावी. शासकीय सेवेत येण्यासाठी कठोर मेहनत, स्वत:वरील आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन घेणे अत्यंत आवश्यक आहे असे विद्यार्थीनींना सांगितले.

तसेच विद्यार्थिनींच्या प्रश्नांचे निराकरण करून त्यावर विस्तृत चर्चा घडवून आणली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयातील विद्यार्थीनींकरिता 'मोफत स्पर्धा परीक्षा' मार्गदर्शन केंद्राच्या अंतर्गत नियमित मोफत वर्ग सुरू करण्याचा मानस महाविद्यालयाचा आहे.

ज्यामुळे मुलींना आपल्याच महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेची तयारी करता येईल. या कोर्स साठी मेहनत घेणाऱ्या सर्व सहभागी प्राध्यापकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. किरण कुलकर्णी यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. आरती धनवे यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अजय पवार यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आभार प्रगटन प्रा. राहुल हिवाळे यांनी केले.या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ ऑक्टोबर २०२५

# धम्मचक्र प्रवर्तन दिन – मानवमुक्तीचा नवा अध्याय

१४ ऑक्टोबर हा दिवस भारतीय इतिहासातील एक विलक्षण आणि परिवर्तनकारी दिवस म्हणून सदैव स्मरणात राहील. १९५६ साली याच दिवशी नागपूर येथील दीक्षाभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन भारतीय समाजात एक नवे सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक युग आरंभले. या घटनेने केवळ धर्मांतराचा एक प्रसंग निर्माण केला नाही, तर भारतीय समाजव्यवस्थेतील शतकानुशतके प्रस्थापित झालेल्या विषमता, अन्याय, अस्पृश्यता आणि गुलामीविरुद्धचा एक अभूतपूर्व सामाजिक क्रांतीचा पाया रचला. हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा केला जातो आणि आजही लाखो लोक दीक्षाभूमीकडे श्रद्धेने नतमस्तक होण्यासाठी, बौद्ध विचारधारा नव्याने आत्मसात करण्यासाठी आणि मानवी मूल्यांचे पुनर्जागरण करण्यासाठी एकत्र येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर भारतीय समाजातील जातिव्यवस्थेच्या अमानवी स्वरूपावर टीका केली. त्यांच्या मते, जात हा धर्माचा भाग नसून मानवी विषमतेला न्याय्य ठरविण्याचे एक साधन आहे. "जात ही भारतीय समाजाच्या प्रगतीला मारक ठरलेली सर्वात मोठी सामाजिक व्याधी आहे," असे ते म्हणत. या विषम व्यवस्थेविरुद्ध त्यांनी केवळ राजकीय आणि कायदेशीर लढा दिला नाही, तर माणसाच्या अंतःकरणातील विचार आणि श्रद्धेचे परिवर्तन हेच अंतिम समाधान असल्याचे त्यांनी ओळखले. त्यासाठीच त्यांनी बुद्धाच्या विचारांचा स्वीकार केला.बुद्धाने सांगितलेला धम्म हा करुणा, प्रज्ञा आणि समतेचा मार्ग आहे. त्यात ईश्वर, आत्मा किंवा विधी-अंधश्रद्धेला स्थान नाही. "अत्त दीपो भव" म्हणजेच "स्वतःचा दीप बन" ही बुद्धाची शिकवण आंबेडकरांनी आपल्या सामाजिक आणि वैचारिक जीवनात आत्मसात केली. बौद्ध धम्माची निवड ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी धार्मिक नव्हे तर मानवी अस्तित्वाची पुनर्परिभाषा होती.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमीवर झालेल्या त्या महासांस्कृतिक घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिशरणांचा स्वीकार करून २२ प्रतिज्ञा घेतल्या. या प्रतिज्ञांनी भारतीय समाजाला एका नव्या मानवतावादी धर्माची, नव्या सामाजिक नैतिकतेची आणि विचारस्वातंत्र्याच्या नवीन युगाची दारे उघडली.या प्रतिज्ञांमध्ये विशेषतः जातीभेद, कर्मकांड, मूर्तिपूजा, ब्राह्मणवादी वर्चस्व आणि अंधश्रद्धेचा त्याग करण्याचा स्पष्ट संदेश आहे. त्यांनी सांगितले की "मी हिंदू देवाची पूजा करणार नाही", "मी कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणार नाही", आणि "मी बुद्धाचा धम्म स्वीकारतो जो विज्ञान, तर्क आणि करुणेवर आधारलेला आहे." या प्रतिज्ञा केवळ धार्मिक नव्हत्या; त्या सामाजिक, नैतिक आणि राजकीय क्रांतीचा घोष होता.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मांतराचा संदर्भ हा भारतातील दलित समाजाच्या स्वाभिमान, आत्मसन्मान आणि अस्तित्वाच्या लढ्याशी जोडलेला आहे. हजारो वर्षांच्या गुलामीतून, अस्पृश्यतेच्या वेदनांमधून बाहेर पडून त्यांनी स्वतःच्या अस्तित्वाला मानवी मूल्यांची ओळख दिली. बुद्धधम्माचा स्वीकार म्हणजे मानवतेचा स्वीकार, समतेचा स्वीकार, आणि विचारस्वातंत्र्याचा स्वीकार होय. दीक्षाभूमी ही त्या नवजागरणाची तीर्थभूमी ठरली. आज ती केवळ धार्मिक स्थळ नाही, तर सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या नवसंस्कृतीचे प्रतीक आहे.धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर आपण पाहतो की आजही भारतीय समाजात जाती, धर्म, वंश, लिंगभाव आणि आर्थिक विषमता अस्तित्वात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न केवळ कायद्यातील समानतेपुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक आणि मानसिक समानतेपर्यंत पोहोचावे अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व नागरिकांना समान हक्क दिले, परंतु त्यांनी याचबरोबर स्पष्ट इशारा दिला की, "राजकीय समानता आणि सामाजिक असमानता एकत्र टिकू शकत नाहीत." म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन ही केवळ एक ऐतिहासिक आठवण नव्हे, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.बुद्धाचा धम्म म्हणजे मध्यममार्ग आहे. जो न अति भोगवादात आहे, न अति संन्यासात. तो विवेक, संयम आणि करुणेचा मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा मार्ग भारतीय समाजासाठी योग्य का मानला, याचे उत्तर त्यांच्या विचारांत सापडते. त्यांनी म्हटले, की "बुद्धाने मला विचार करण्याचे स्वातंत्र्य दिले." बुद्धधम्म हा व्यक्तीच्या स्वतंत्र विचारक्षमतेचा आणि तर्कनिष्ठतेचा धर्म आहे. तो कोणत्याही प्रकारच्या दैवी अधिकारावर विश्वास ठेवत नाही, तर माणसाच्या स्वतःच्या बुद्धीवर विश्वास ठेवतो.धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी लाखो अनुयायी नागपूरच्या दीक्षाभूमीवर एकत्र येतात. येथे केवळ धार्मिक विधी होत नाहीत, तर वाचन, चिंतन, व्याख्याने, समाजसेवा आणि जनजागृती यांचे आयोजन केले जाते. लोक बुद्धाची शिकवण केवळ विहारात नव्हे, तर आपल्या आचरणात उतरवतात. हा दिवस सामूहिक ऐक्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या भावनेचा उत्सव आहे.बुद्धाचे "अहिंसा", "मैत्री", "करुणा" आणि "सम्यक दृष्टी" हे धम्माचे मूलतत्त्व आजच्या जगासाठीही अत्यंत आवश्यक आहेत. जागतिक स्तरावर वाढत असलेला धार्मिक द्वेष, हिंसा, असहिष्णुता आणि पर्यावरणीय संकटे पाहता बुद्धधम्म आणि बौद्ध तत्त्वज्ञान आज अधिक सुसंगत वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की, "जग बदलायचे असेल, तर विचार बदलावे लागतील." आजही त्या विचारांचीच गरज आहे.धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणजे माणसाच्या आत्मजागृतीचा दिवस आहे. तो प्रत्येकाला विचार करायला लावतो की आपण माणूस म्हणून किती प्रगल्भ आहोत? आपल्या समाजात अजूनही भेदभाव आहे का? आपण खऱ्या अर्थाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचे पालन करतो का? बुद्धधम्माचा स्वीकार म्हणजे या प्रश्नांना प्रामाणिकपणे सामोरे जाणे होय.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हे संघर्षाचे, पण त्याहूनही अधिक विचारक्रांतीचे प्रतीक होते. त्यांनी समाजात "मनुष्य म्हणून जगण्याचा हक्क" मागितला आणि तो मिळवून दिला. त्यांनी धर्माला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांनी दाखवून दिले की धर्म जर माणसाला समानतेचा, प्रेमाचा आणि स्वातंत्र्याचा संदेश देत नसेल, तर तो धर्म माणसाचा शत्रू आहे. म्हणूनच त्यांनी सांगितले, "जात हा धर्म नाही, आणि धर्म जर विषमता शिकवत असेल, तर असा धर्म माणसाचा शत्रू आहे."धम्मचक्र प्रवर्तन दिन हा त्या विचाराचा पुनर्जन्म आहे. हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की खरा धर्म तोच, जो माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देतो. बुद्धधम्मने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना केवळ वैयक्तिक शांती दिली नाही, तर संपूर्ण समाजाला नव्या आत्मविश्वासाची प्रेरणा दिली. आज लाखो अनुयायी त्यांच्या धम्ममार्गावर चालत आहेत, त्यांच्या जीवनात बुद्ध, धम्म आणि संघ हे त्रिरत्न जिवंत आहेत.आजच्या तरुण पिढीसमोर बुद्ध आणि आंबेडकरांचे विचार अधिक सुसंगत आहेत. शिक्षण, तर्क, विज्ञान, पर्यावरण आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांवर बुद्धधम्माची शिकवण आजही मार्गदर्शक आहे. करुणा आणि प्रज्ञा यांच्या संतुलनाने समाजात शांतता निर्माण होऊ शकते. म्हणूनच धम्मचक्र प्रवर्तन दिन हा फक्त एका धर्माचा उत्सव नाही, तर संपूर्ण मानवजातीच्या नवजागृतीचा संदेश देणारा दिवस आहे.आज आपण या दिवसाचे स्मरण करताना फक्त ऐतिहासिक अभिमान बाळगू नये, तर त्या विचारांचे अनुकरण करावे. समाजात अजूनही अन्याय, विषमता आणि हिंसा आहे. आंबेडकरांचे धम्मांतर हे त्या सर्वांविरुद्धचा अखंड संघर्ष आहे. त्यांचा संदेश स्पष्ट आहे की "माणसाच्या मनात जोवर अंधश्रद्धा, भय आणि दास्यभाव आहे, तोवर त्याचे खरे स्वातंत्र्य शक्य नाही." म्हणूनच प्रत्येकाने आपल्या विचारांमध्ये प्रकाश आणावा, अंधाराला दूर करावे आणि मानवतेचा मार्ग स्वीकारावा.दीक्षाभूमीवर दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना लाखो अनुयायांचे एकत्र येणे म्हणजे एका आदर्श समाजाच्या निर्मितीचे प्रतीक आहे. असा समाज जो जात, धर्म, वर्ग, लिंगभेदापलीकडे जाऊन समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांवर आधारलेला आहे. हीच खरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आणि बुद्धाला मानवतेची अभिवादन करण्याची सर्वोत्तम पद्धत आहे.शेवटी, धम्मचक्र प्रवर्तन दिन आपल्याला केवळ भूतकाळाची आठवण करून देत नाही, तर भविष्याचे दिशादर्शन करतो. हा दिवस आपल्याला सांगतो की परिवर्तन शक्य आहे. जेव्हा माणूस विचार करतो, प्रश्न विचारतो आणि सत्याचा मार्ग स्वीकारतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी जे चक्र प्रवर्तित केले, ते केवळ धर्माचे नव्हे, तर मानवतेचे धम्मचक्र होते, जे आजही फिरत आहे, आणि सदैव फिरत राहील.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)***
**मो. क्र. ९९६०१०३५८२, ईमेल –**
**bagate.rajendra5@gmail.com**